॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

जळगाव. २१ ( ) आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात गुरुवारी योग प्रात्यक्षिके घेण्यात आली.

गुरुवार, दि. २१ जून रोजी सकाळी ७ ते ८ या दरम्यान पदवीप्रदान सभागृहात शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासाठी योग प्रात्यक्षिक घेण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर , कुलसचिव भ.भा.पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक प्रा.एस.टी.इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.जे.बी.नाईक, राष्ट्रीय छात्रसेनचे कर्नल दिलीप पांडे, कर्नल ॲलेक्स् जोसेफ यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा.गितांजली भंगाळे यांनी योगासनाबाबत माहिती दिली तर श्रध्दा व्यास या विद्यार्थिनीने योगासनाचे प्रात्यक्षिके करुन दाखविले. यावेळी एनसीसी बटालियन १८ चे विद्यार्थी, विद्यापीठातील प्राध्यापक, विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. विद्यापीठ उप अभियंता राजेश पाटील, क्रीडा संचालक डॉ.दिनेश पाटील तसेच विद्यार्थी विकास विभाग यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

---

जा.क्र . : उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दिनांक : २१ जून, २०१८

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
North Maharashtra University, Jalgaon
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle
पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगांव.२१ (     ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या प्री-पीएच.डी कोर्सवर्कच्या तारखांमध्ये बदल करण्यात आला असून २६ जून ऐवजी १६ जुलै ते २१ जुलै या कालावधीत हा कोर्सवर्क होणार असून विद्यार्थ्यांनी या बदलाची नोंद घ्यावी असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

विविध विद्याशाखांच्या प्री-पीएच.डी कोर्सवर्कची तारीख यापूर्वी २६ जून ते १ जुलै अशी जाहीर करण्यात आली होती. मात्र काही अपरिहार्य कारणामुळे या तारखांमध्ये आता बदल करण्यात आला असून हा कोर्सवर्क १६ जुलै ते २१ जुलै या कालावधीत होणार असल्याची माहिती प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांनी दिली. तारखांमध्ये झालेल्या या बदलाची नोंद घ्यावी असे आवाहन कोर्सवर्कचे चेअरमन प्रा.एस.टी.इंगळे यांनी केले आहे. यासंदर्भातील सविस्तर माहिती विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

---

**बातमी क्र.२**

जळगाव. २१ (     ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ प्रशाळा व संलग्नित महाविद्यालयातील एम.एस्सी./एम.ए. प्रथम वर्ष या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विविध विषयासाठी केंद्रीय पध्दतीने दिल्या जाणाऱ्या प्रवेशासाठी ऑनलाईनद्वारे अर्ज भरण्यासाठी २९ जून पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

विद्यार्थी हित लक्षात घेवून व बी.एस्सी.च्या विद्यार्थ्यांनी पुनर्मूल्यांकनासाठी केलेल्या अर्जाचा निकाल जाहीर होणे बाकी असल्यामुळे कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी २९ जून पर्यंत अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ दिली आहे. यापूर्वी २१ जून पर्यंत अर्ज भरण्याची तारीख देण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी ही मुदतवाढ लक्षात घेवून ऑनलाईन अर्ज भरावेत. विद्यापीठाच्या www . nmu.ac.in या संकेतस्थळावर ऑनलाईन माहिती व नोंदणी अर्ज विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

विद्यार्थ्यांनी नोंदणी शुल्क चलनाद्वारे सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत अदा करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी माहितीपत्रकाची प्रिंट काढून व्यवस्थित वाचून माहिती ऑनलाईन भरावी. २९ जून पर्यंत ऑनलाईन नोंदणी अर्ज भरता येतील. २ जुलै पर्यंत विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेले अर्ज स्वीकृती केंद्रावर आवश्यक त्या कागदपत्रांसह जमा करणे आवश्यक आहे. ते जमा न केल्यास ऑनलाईन प्रक्रियेतून बाद ठरविले जाईल. ५ जुलै रोजी प्राथमिक गुणवत्ता यादी जाहीर होईल. ७ जुलै पर्यंत त्यावर आक्षेप नोंदविता येतील. ९ जुलै रोजी अंतिम गुणवत्ता यादी जाहीर होईल. त्यानंतर प्रवेश प्रक्रियेच्या ऑनलाईन फेऱ्या होणार आहेत. त्याची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे. अर्ज स्वीकृती केंद्राची माहिती देखील संकेतस्थळावर उपलब्ध आहे, अशी माहिती प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांनी दिली.

---

जा.क्र . : उमवि/१६/हस्तदेय /२०१८ — दिनांक : २१ जून, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी